# राष्ट्रीय आरोग्य अभियान, लातूर
## खालील पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवाराकरीता जाहिर सुचना
## मुळ कागदपत्र तपासणी व समुपदेशन

राष्ट्रीय आरोग्य अभियान, लातूर अंतर्गत विविध पदांच्या पदभरती करीता दिनांक १३/०१/२०२४ ते २९/०१/२०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने खालील पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे प्रारुप पात्र व अपात्र यादया आक्षेपाकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे विविध पदाची अंतिम पात्र अपात्र यादी प्रसिध्द करण्यात करण्यात येत आहे. तसेच समुपदेशनाकरीता संवर्गनिहाय गुणवत्तेनूसार प्रसिध्द करण्यात येणा-या यादीतील एकास तीन प्रमाणे उमेदवारांना खालील दिनांकास उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात येत आहेत.

तसेच सोबत जोडण्यात आलेली यादी ही मुळ कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | मुळ कागदपत्र तपासणी व समुपदेशन दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | Entomologists | दिनांक २४/०६/२०२४<br>वेळ सकाळी १०.०० वाजता | यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, लातूर |
| २ | Public Health Specialist | | |
| ३ | Lab Technician | | |
| ४ | District Program Manager (AYUSH) | | |
| ५ | Data Entry Operator | | |
| ६ | Yog Teacher | | |
| ७ | Ayush Medical Officer | | |
| ८ | Medical Officer –Male | | |

**वरील नमूद पदांची सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी ही फक्त उमेदवारांची शैक्षणिक गुणवत्ता, उच्च शिक्षण व शासकिय अनुभवाच्या गुणाकांवर करण्यात आलेली आहे.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

याव्दारे उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रति कागदपत्र पडताळणीच्या वेळेला सादर कराव्यात. तसेच अनुभव प्रमाणपत्र सक्षम अधिकारी (जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/आरोग्य अधिकारी मनपा इत्यादी) यांच्या स्वाक्षरीचे कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा आपण सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे अनुभवासाठी देण्यात आलेले गुण गृहित धरण्यात येणार नाहीत व देण्यात आलेले गुण कमी करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच मुळ कागदपत्र तपासणी व समुपदेशनाच्या दिवशी गैरहजर राहणा-या उमेदवारास सदर भरतीप्रक्रियेतून अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उपरोक्त नमुद पदासाठी कोणीही खाजगी व्यक्ती, मध्यस्थ यांच्या अमिषाला बळी पडु नये.

(डॉ. वडगावे एच.व्ही.)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

Scanned with OKEN Scanner